## अंतिम अहवाल नि.क्र.०१ वरील आदेश.

(दिनांक ११ मे, २०२२ रोजी पारीत.)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दंडनीय अपराधाकरीता दाखल केलेला आहे.

०२. आरोपींतर्फे वकिलांनी नि.क्र.३७ कडे पुरसिस दाखल करुन आरोपी क्र.०३ भगवान नामदेव दुधाणे हा दिनांक २४.०६.२०२१ रोजी मरण पावला आहे असे कथन केले आहे. नि.क्र.३७ कडील पुरसिस लगत आरोपी क्र.०३ च्या मृत्यू दाखल्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यामध्ये आरोपी क्र.०३ भगवान नामदेव दुधाणे हा दिनांक २४.०६.२०२१ रोजी मौजे दुधाणेवाडी, घोटवडे, ता.सुधागड, जि.रायगड येथे मरण पावला आहे असे मृत्यू प्रमाणपत्रावरुन दिसुन येत आहे. आरोपी मरण पावल्याने खटला संपुष्ट (Abate) करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक झाले आहे, म्हणून खालीप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### :: आ दे श ::

आरोपी क्र.०३ भगवान नामदेव दुधाणे याचे विरुध्दचा भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १४३, १४७, १४९, ३२४, ३२३, ५०४, ५०६ नुसार प्रलंबित असलेला खटला फौजदारी नियमावलीतील प्रकरण ६ परिच्छेद क्रमांक ८४ अन्वये संपुष्ट (Abate) करण्यात येतो.

स्वाक्षरी/-

**ठिकाणः पाली.** **( मीना वा. जाधव )**

**दिनांकः ११/०५/२०२२.** **प्रथम वर्ग, न्यायदंडाधिकारी, पाली.**